**कृपया प्रसिद्धीसाठी** **16 जुलै 2013**

**लोकसभा निवडणुकीसाठी मतदार याद्या निर्दोष करुन त्यांचे पावित्र्य राखा- राम नाईक यांचे आवाहन**

**मुंबई, मंगळवार :**''संसदीय लोकशाही यशस्वी करण्यासाठी मतदार याद्या निर्दोष करुन त्यांचे पावित्र्य राखा, निवडणूक यंत्रणेचे ते कर्तव्य आहे'', असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबई शहर जिल्हा निवडणूक अधिकारी श्री.चं.व.ओक यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करताना केले. मुंबई उपनगर जिल्ह्याचे निवडणूक अधिकारी श्री. संजय देशमूख रजेवर असल्यामुळे त्यांचा कार्यभार सध्या श्री. ओक यांच्याकडेच आहे. 15 जुलै रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी भाजपाचे नगरसेवक श्री. विनोद शेलार आणि जिल्हा उपनिवडणूक अधिकारी श्रीमती माया पाटोळे हजर होत्या. ही माहिती श्री. राम नाईक यांच्या जनसंपर्क कार्यालयातून प्रसिद्ध केलेल्या पत्रकात देण्यात आली आहे.

मतदार याद्या निर्दोष करण्याच्या प्रक्रियेसंबंधी माहिती सांगताना श्री.राम नाईक म्हणाले,''2014 मध्ये होणा-या लोकसभा निवडणुकीचे नगारे आता वाजू लागले आहेत. निवडणुका ख-या अर्थाने यशस्वी होण्यासाठी मतदार याद्या हा महत्त्वाचा घटक आहे. त्यांचे पावित्र्य राखण्यासाठी त्या निर्दोष तयार करणे निवडणूक यंत्रणेचे कर्तव्य आहे. 2004 च्या निवडणुकीच्या वेळी मतदार याद्यात अनेक मतदारांची छायाचित्रे नाहीत, मोठ्या प्रमाणावर दुबार (डुप्लिकेट) मतदार आहेत, अनेक इमारतीच गायब झाल्या आहेत अशा तक्रारी झाल्या. बोरीवली, कांदिवली आणि मालाड विधानसभा मतदार संघांच्या याद्यांची मुंबईतील 34 आणि ठाणे लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदारसंघातील म्हणजे 40 विधानसभा मतदार संघातील याद्यांची तुलना केल्यानंतर 18,02,887 मतदारातील 3,57,520 म्हणजेच 20 टक्के मतदार दुबार असल्याचे स्पष्ट झाले. ही सर्व माहिती तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त श्री.एन्. गोपाळस्वामी आणि महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देवाशिष चक्रवर्ती यांना प्रत्यक्ष चर्चा करुन सादर केली. त्याबद्दलचा पाठपुरावाही चालू होता. त्यामुळे आता मतदार याद्यांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश निर्वाचन आयोगाने दिले आहेत.''

याद्यांची पुनर्तपासणी योग्य पद्धतीने करुन त्या निर्दोष करण्यासाठी पुढील पाच सुचनांचा विचार करण्याबद्दल चर्चा झाली असल्याचे श्री. राम नाईक यांनी सांगितले.:1) मतदारांची नावे घरोघर जाऊन तपासावीत म्हणजे संबंधित घरे आहेत की नाहीत याची खात्री होईल. घरे सापडत नसल्याबद्दल तपासणी निरीक्षकांनी त्याप्रमाणे प्रमाण-पत्र दिले पाहिजे. त्या आधारावर नावे कमी करण्याची वैधानिक प्रकिया करता येऊ शकेल. 2) **कोणत्याही परिस्थितीत मतदार याद्यामध्ये 100 टक्के छायाचित्रे असली पाहिजेत याकडे कटाक्षाने लक्ष पुरवावे.**ज्यांची छायाचित्रे मतदार यादीत नाहीत त्यांना 'नोटीस' देऊन छायाचित्रे काढून घेण्यात सांगावे. ठराविक मुदत द्यावी, त्या मुदतीत छायाचित्रे न काढल्यास वैधानिक प्रक्रिया पूर्ण करुन त्यांची नावे मतदार यादीतून काढून टाकावी. 3) ज्यांची नावे दुबार आहेत त्यांना 'नोटीस' देऊन कोणते नाव ठेवायचे आणि कोणते गाळायचे हे त्यांच्याकडून लिहून घ्यावे. तसेच त्यांची छायाचित्रे काढण्याची व्यवस्था करावी. 4) घरोघर जाऊन तपासणी करताना **ज्या इमारतींचा पुनर्विकास चालू असल्याने मतदार तिथे रहात नसतील** परंतु त्यांची छायाचित्रे मतदार यादीत असतील अशांच्यासाठी योग्य नियम करुन **त्यांचे मतदानाचे हक्क अबाधित राहतील याची काळजी घ्यावी**. 5) घरोघर जाऊन तपासणी होईल त्यावेळी मृत मतदारांची नावे रद्द करण्यासंबंधी त्या कुटुंबातील अन्य मतदाराची स्वाक्षरी घ्यावी म्हणजे नंतर वाद निर्माण होणार नाही.

''वरील सूचना तपासून घेऊन सविस्तर चर्चा भाजपाच्या शिष्टमंडळाशी आठ-दहा दिवसात करण्यात येईल असे आश्वासन जिल्हा निवडणून अधिका-यांनी दिले आहे'', असे ही पत्रकाच्या शेवटी श्री. राम नाईक यांनी सांगितले आहे.

**(कार्यालय सचिव)**